सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर
चतुरस्र परखड रास्त कर्तव्यदक्ष

# चपराक

पुणे

मूल्य ३₹

संपादक : घनश्याम पाटील

www.chaprak.com

वर्ष : ६ अंक : ०७ पाने : ०४

■ सोमवार, दि. २९ फेब्रुवारी ते ०६ मार्च २०१६ ■ RNI No. MAHMAR/2011/35979 ■ पोस्टल नोंदणी क्र. : PCW/159/2014-2016

Licensed to post without prepayment of postage no. WPP - 14 Posted at Pune PSO on every wednesday, date of publication 29/02/2016

KaMani masale
किंग ऑफ टेस्ट
व्हेज-नॉनव्हेजचे स्वादिष्ट मसाले
संपर्क : डी. एम. कामंत फूड प्रॉडक्टस् प्रा. लि.
तिरूमला इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट नं. ४,
टाटा जॉन्सन कंपनीसमोर, हिंजवडी, पुणे ४११ ०५७
दूरध्वनी ०२०-६५२९२४००
Email : dkamant@rediffmail.com Web : www.kamantmasale.com

# दिवाळी अंकांमुळे मनोरंजन व संस्कृती संवर्धन : सावंत

पुणे, (प्रतिनिधी) : दिवाळी अंकांची परंपरा खूप जुनी आहे. पूर्वी साहित्यक्षेत्रात दिवाळी अंकांचे खूप मोठे योगदान होते. प्रबोधन, मनोरंजन व संस्कृती संवर्धनाची मोठी परंपरा दिवाळी अंकांना आहे. मात्र 'किर्लोस्कर'सारखे खूप चांगले अंक बंद पडले. सध्या फेसबुक, व्हॉट्सअप अशा समाजमाध्यमांमुळे आजच्या पिढीचे वाचन कमी होत चालले आहे, असे मत ज्येष्ठ पत्रकार आणि ग्रंथसखा शशिकांत सावंत यांनी व्यक्त केले.

मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई यांच्या वतीने मुंबईत मराठी भाषा दिवसानिमित्त एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात 'दिवाळी अंकांची शतकोत्तर वाटचाल' या विषयावर सावंत यांचे व्याख्यान झाले. यावेळी सुप्रसिद्ध कथालेखक आनंद वेदपाठक, 'चपराक'चे संपादक आणि प्रकाशक घनश्याम पाटील, वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष विजय कदम, सचिव रविंद्र मालुसरे, माजी अध्यक्ष दिगंबर चव्हाण, कार्याध्यक्ष अरूण खटावकर, सुनील कुवरे, पास्कोल लोबो, प्रा. हेमंत सामंत, तुकाराम कदम उपस्थित होते.




या कार्यक्रमात मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ३९ व्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेतील विजेत्या दिवाळी अंकांना पारितोषिके देण्यात आली.



■ मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई यांच्या तर्फे दिला जाणारा 'उत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार' स्वीकारताना 'चपराक'चे संपादक घनश्याम पाटील, सहसंपादक माधव गिर, व्यवस्थापक तुषार उथळे-पाटील आणि 'चपराक'चे लेखक अशोक व सुवर्णा जाधव.

## 'चपराक'ला उत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार

दिवाळी अंक संपादकांच्या वतीने प्रातिनिधिक मनोगत व्यक्त करताना 'चपराक'चे घनश्याम पाटील म्हणाले, काही ठोकळेबाज विचारसरणीचे समीक्षक आणि साहित्य क्षेत्रातील डुड्ढाचार्य सातत्याने वाचनसंस्कृती कमी झाल्याची आवई देतात. मात्र प्रत्यक्षात तसे नाही. वाचनसंस्कृती वाढते आहे आणि त्यासाठी समाजमाध्यमांचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतोय. दर्जा आणि दिवाळी अंकाचे व्यवस्थापन न जमलेले अंक बंद पडत आहेत. याचवेळी नवीन खूप चांगले दिवाळी अंक साहित्य संस्कृतीचे जतन करण्यासाठी हातभार लावताना दिसत असून हे चित्र आश्वासक आणि समाधानकारक आहे. त्यामुळेच यंदा आम्ही 'चपराक'चा सहा राज्यातील दीडशे लेखकांचा सहभाग असलेला ४६८ पानांचा महाविशेषांक प्रकाशित करू शकलो.

यावेळी अपना सहकारी बँकेचे जनसंपर्क अधिकारी आणि कथालेखक आनंद वेदपाठक यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमात मनोरंजनकार का. र. मित्र स्मृती सर्वोत्कृष्ट अंक-प्रतिभा, साने गुरूजी स्मृती सर्वोत्कृष्ट बालवाङ्मय अंक-वयम, पांडुरंग रा. भाटकर स्मृती सर्वोत्कृष्ट धार्मिक अंक-आनंदघन, पु. ल. देशपांडे स्मृती सर्वोत्कृष्ट विनोदी अंक-लेखी संवाद, प्रतापराव माने स्मृती उत्कृष्ट अंक-रोखठोक, कृष्णराव भानुसे स्मृती उत्कृष्ट अंक-भवताल, गणेश केळकर स्मृती उत्कृष्ट अंक-वसंत, तर 'साहित्य चपराक', कुडाळदेशकर युवा, दुर्गांच्या देशातून, सृजनसेतू, शब्दालय, न्युजरूम लाइव्ह यांना 'उत्कृष्ट दिवाळी अंक' म्हणून गौरविण्यात आले. कान्हेरी, अक्षरभेट, संस्कारदीप, समताबोध, रंगतरंग, विश्वभ्रमंती, साई निर्णय, पुढचं पाऊल, बहिणा, आगरी दर्पण, आनंदाचे डोही यांना उल्लेखनीय अंक म्हणून तर आवाजकार पाटकर स्मृती सर्वोत्कृष्ट मुखपृष्ठ-शब्दमल्हार यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष विजय कदम यांनी केले व सूत्रसंचालन संघाचे प्रमुख कार्यवाह श्रीकांत मयेकर यांनी केले.

## 'चपराक'ची वाचनीय पुस्तके



पाने : १७६,
किंमत : १५०

### दखलपात्र

'सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर' हे ब्रीद घेऊन चतुरस्र, परखड, रास्त आणि कर्तव्यदक्ष भूमिकेतून 'चपराक'ची वाटचाल सुरू आहे. रोखठोक आणि परखड विश्लेषण केल्याने, सातत्याने ठाम भूमिका घेऊन सत्याचा कैवार घेतल्याने 'चपराक'चे अग्रलेख वाचकप्रिय ठरले आहेत. साप्ताहिक 'चपराक' आणि 'साहित्य चपराक' मासिकातील घनश्याम पाटील यांचे निवडक अग्रलेख या संग्रहात वाचायला मिळतील.

### बाळासाहेब एक अंगार

बाळासाहेब ठाकरे! महाराष्ट्राचे राजकारण तळापासून ढवळून काढणारे नाव. ५० वर्षे सतत धगधगत असलेला हा अंगार. माणूस म्हणून ते होते तरी कसे? त्यांचा स्वभाव कसा होता? वागणं कसं होतं? त्यांच्या आयुष्यात कोणकोणत्या घटना घडल्या? या सर्व गोष्टी समजून घेण्यासाठी नागेश शेवाळकर यांचे हे पुस्तक नक्की वाचा.

**पाने : १६०, किंमत : १७५**







पाने : १६०,
किंमत : १५०

### ओविली फुले मोकळी

सर्वसामान्य माणसाला वाटणाऱ्या काळज्यांबद्दल, भीतीबद्दल, त्याला हव्या असणाऱ्या किमान स्वास्थ्याबद्दल, तो शोधत असणाऱ्या आधाराबद्दल वाचकांशी एकरूप होऊन केलेले चिंतन म्हणजे सुप्रसिद्ध साहित्यिक सदानंद भणगे यांचे या पुस्तकातील लेख. हे लेख वाचताना वाचक जगण्यावर प्रेम करू लागतात.

### भाषेचं मूळ

भाषा मूळात अस्तित्वात कशा आल्या? माणसालाच हे वरदान का? मानव जगभर समान असला तरी भाषाभाषात एवढे विभेद का? भाषागट कसे जन्माला येतात? एका भाषेतून सहयोगी भाषेचा जन्म होतो, हे खरे आहे का? भाषागट कितपत संयुक्तिक आहेत? संस्कृतमधून प्राकृत भाषा निर्माण झाल्या की सत्य वेगळेच आहे? हे समजून घेण्यासाठी सुप्रसिद्ध साहित्यिक आणि संशोधक संजय सोनवणी यांचं हे पुस्तक उपयुक्त ठरेल.




**पाने : ११२ किंमत : ११०**

या पुस्तकांसाठी संपर्क :
०२०-२४४६०९०९/७०५७२९२०९२

सुवर्णाक्षरे



**सुवर्णा जाधव**, मुंबई
९८१९६२६६४७

# खत...पाणी...



*माळ्याला* झाडांना, छोट्या रोपांना पाणी घालताना आपण पहात असतो. सकाळ-संध्याकाळी तो झाडांना पाणी घालतो. रोपं रुजावीत, चांगली वाढावीत म्हणून त्यांना नेमाने खत टाकतो. कधी कधी झाडांमध्ये तण उगवते. अनावश्यक तण, गवत तो काढून टाकतो... रोगराई होऊ नये म्हणून औषध फवारणी करतो. खूप खूप काळजी घेतो आणि झाडं, जंगलं चांगली वाढली की समाधानी होतो. त्याच्या चेहऱ्यावरच हास्य फुलतं...

पण खूप मोठ्या झालेल्या, वाढलेल्या झाडांकडे तो जास्त लक्ष देत नाही. कारण त्याला माहीत असतं की झाडाची जगण्याची स्वतःची क्षमता निर्माण झाली आहे. झाडाची मुळे खोलवर जाऊन स्वतः पाणी शोधून घेऊ शकतात... जगू शकतात...

लहान मुलं, वाढत्या वयातली मुलं/मुली या रोपांसारखीच असतात. त्यांच्याकडे लक्ष पुरवणं अगदी गरजेच असतं. त्यांच्या मानसिक व बौद्धिक वाढीस पूरक ठरतील अशा गोष्टीकडे लक्ष द्यायलाच हवं. विविध संस्कार करायलाच हवे. चांगल्या विचारांच खतपाणी घालायला हवं... वाईट सवयी ज्या तणासारख्या वाढू शकतात त्यांना वेळीच नष्ट करायला हव्यात. अगदी रोपांसारखी त्यांची काळजी घेवून त्यांना जोपासायला हवं.

घरी मुलांना जोपासण्याची माळ्याची भूमिका घरी आई-वडील, आजी-आजोबा पार पाडत असतात तर शाळेत ही भूमिका शिक्षकांना पार पाडावी लागते.

शाळेमध्ये असताना विद्यार्थ्यांना शिक्षकांबद्दल खूप आदर असतो. शिक्षक त्यांचं श्रद्धास्थान असतं. त्यामुळे शिक्षकांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडतो. त्यामुळेच या उमलत्या वयात शाळेत काही आघात झाले, अपमान झाले तर विद्यार्थी कोलमडून पडतात. उमलण्या आधीच मिटतात, पण जर त्यांना प्रेरणा मिळाल्या, योग्य दिशा मिळाली तर खूप चांगलं व्यक्तिमत्त्व घडण्यास मदत होते. एक विकसित प्रसन्न फुलात रूपांतर होऊ शकेल. त्यामुळेच शाळा, महाविद्यालयांमध्ये अभ्यासाशिवाय जे व्यक्तिमत्त्व विकासाचे कार्यक्रम राबवतात, त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच!

म्हणतात ना योग्य वयात दिशा दाखवली नाही तर आयुष्याची दशा व्हायला वेळ लागत नाही, अशा प्रोत्साहनपूरक व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रमातून प्रेरणा मिळत जातील आणि केवळ घोकमपट्टी करुन उत्तीर्ण होण्याऐवजी जीवनाचा अर्थ समजलेले सुजाण तयार होतील.

---

# आदर



आमच्या लहानपणी आम्ही संक्रांतीच्या दिवशी तिळगूळ घ्यायला किंवा दसऱ्याच्या दिवशी सोनं घ्यायला गुरुजींच्या घरी जायचो. त्यांच्या पाया पडायचो. गुरुजी खुर्चीवर बसलेले असायचे. शेजारी फूलपात्रात तिळगूळ असायचे. पाया पडल्यावर गुरुजी आशीर्वाद द्यायचे. त्यांच्या पत्नीशी आमची ओळख करून द्यायचे. ती माऊली आम्हाला मायेने जवळ घ्यायची, विचारपूस करायची, कौतुकाने आम्हाला काहीतरी खायला द्यायची. हिंदू संस्कृतित 'आदर' दाखवायला कितीतरी महत्त्व आहे. दिवाळी, पाडव्याच्या दिवशी घरातल्या सगळ्या मोठ्या लोकांच्या पाया पडणे, त्यांचे आशीर्वाद घेणं म्हणजे पुण्याई गाठी साठवल्यासारखंच वाटायचं.

एखाद्यासमोर नतमस्तक होणं म्हणजे त्याचा मान राखणे, त्याचा आदर करणे. अर्थात समोरचा तेवढ्या लायकीचा हवा आणि आपल्याही अंगी लीनता हवी.

आदर केवळ पाया पडल्यानेच दाखवता येतो असे नाही तर केवळ नमस्कारानेही दाखवता येतो. आपल्यापेक्षा वयाने मोठा समोर आला तर उठून उभे रहाणे, मोठ्यांशी लहान आवाजात बोलणे ह्या सगळ्या गोष्टी म्हणजेच आदर दाखवणे होय आणि हा आदर मनातून असला तरच तो दिसतो. तो खोटा नाटकी दाखवायला गेला तर तो सगळ्यांनाच समजतो.

एखाद्याच्या बाबतीत सदभाव ठेवणे म्हणजे आदर राखणे. दुसऱ्याची कुचेष्टा केल्याने आपण मोठे होत नसतो तर दुसऱ्याचा आदर राखला तरच आपला आदर राखला जातो आणि हा आदर आपल्या बोलण्यातून, वागण्यातून व्यक्त होत असतो. त्यासाठी अतिशयोक्तिची आवश्यकता नसते.

आपल्या घरी पाहुणे आले तर आपण त्यांचा आदर सत्कार करतो, म्हणजे त्यांना चहापाणी, फराळासाठी विचारतो, त्याच्यासाठी गोडधोड जेवणाचं करतो हा एक प्रकारे आदर दाखवण्याचाच प्रकार असतो. एखाद्या संस्थेत जेव्हा पाहुणे येतात तेव्हा त्यांचा आदर सत्कार हार, गुच्छ, नारळ, शाल, सन्मानचिन्ह ह्याद्वारे केला जातो. पाहुण्यांचा असा सत्कार म्हणजे संस्था दाखवीत असलेला आदरच. तो जसा पाहुण्यांचा सन्मान असतो तसाच तो संस्थेचाही सन्मान असतो. जो कतृत्वाने मोठा असतो त्याच्यासमोर आपोआपच आपली मान लवते. ह्यात आपला कमीपणा नसतो तर समोरच्याचा मान राखण्याचा तो एक भाग असतो. काही लोकांना हाताखालच्या लोकांना अरे तुरे करण्याची सवय असते. विशेषतः एकाच कार्यालयात व्यवस्थापनात काम करताना स्त्रियांशी बोलतानाही काहीजण एकेरीवर येऊन बोलतात. खरंतर अशावेळी एकमेकांचा आदर संभाळणे हा त्या संस्थेचा आदर संभाळण्याचा एक भाग असतो.

आम्ही मोठ्यांविषयी आदर दाखवताना नतमस्तक होतो, गुरुंविषयी आदर दाखवताना कानांना हात लावतो, माता-पित्याविषयी आदर दाखवताना आम्ही नम्रतेने बोलतो, त्यांच्याशी वादविवाद करत नाही, उलट उत्तरे देत नाही. आम्ही प्राणीमात्रांविषयी आदर दाखवतो. गाईला देव मानतो. पोळ्याच्या दिवशी बैलाची पूजा करतो. महान कलावंतसुद्धा रंगमंचावर प्रवेश करताना रंगमंचाला उजवा हात लावून नमस्कार करतो. पायातली वहाणे खाली काढून ठेवतो. भारतीय संस्कृतीमध्ये म्हणूनच आदराला फार महत्त्व आहे. घरात येणाऱ्या प्रत्येक परक्या माणसालासुद्धा आम्ही या बसा म्हणतो, त्यांना पाणी, चहा देतो, क्षेमकुशल विचारतो. आदरभाव दाखवणं हा मनुष्यस्वभाव आहे. ज्यांना असा दुसऱ्याचा आदर राखता येत नाही ती माणसंच नव्हेत... महान स्त्री पुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी साजऱ्या करून आम्ही त्याच्या विषयीचा आदर दाखवतो, तर वेगवेगळया खेळाडूंचा, साहित्यिकांचा, कलावंतांचा दर वर्षी वेगवेगळी पारितोषिके देऊन सन्मान केला जातो, हा जणू देशाने केलेला त्यांचा सन्मानच... त्यांच्या विषयीचा आदरभाव त्याद्वारे व्यक्त केला जातो. आपल्याला आदर मिळावा असे वाटत असेल तर आपणही दुसऱ्याचा आदर राखायला शिकायला हवं...



शब्दतरंग

**सदानंद भणगे**, नगर
९८९०६२५८८०

---

# अॅज डेड अॅज डोडो

'*अॅज* डेड अॅज डोडो' अशी एक इंग्रजी म्हण आहे. शेजारच्या चिमुकल्या सावरीच्या फ्रॉकवर 'डोडो' पक्ष्याचे चित्र छापलेले होते. तो झगा नवा असल्यामुळे सावरी मला म्हणाली, ''काका, माझा हा ड्रेस बघा..'' मी हसून विचारले, ''हा तुझ्या फ्रॉकवरचा पक्षी कोणता गं?'' तिने त्या अजागळ, बदकासारख्या पक्ष्याकडे किंचित नाराजीनेच पाहिले व म्हणाली, ''माहीत नाय! असेल बदकबिदक...'' सावरीला तो गबाळा पक्षी नकोच होता. त्यापेक्षा एखादा झगमगीत मोर असता, तर तिने तो मिरवला असता. डोडो हा काही शोभेचा लव्हबर्ड नाही! शिवाय, तो बापडा आता पृथ्वीवर आहेच कुठे? 'डोडो' असणे, डोडोसारखे असणे हेच चुकीचे ठरत गेले. डोडोने कुणाचे काही वाकडे केले नव्हते. तो गुंड, मवाली, आक्रमक नव्हता. त्याला बिचाऱ्याला उंच उडताही येत नव्हते आणि बचावासाठी सळसळत, सरपटत एखाद्या बिळात शिरणे, लपणे हे सुद्धा अशक्य होते. त्यामुळे त्याची बेफाम शिकार झाली... आणि 'डोडो' कायमचा संपला!



निरुपद्रवी असणे आजच्या क्रूर समाजव्यवस्थेत फार धोक्याचे ठरत आहे. सज्जन असणे म्हणजे दुर्बल असणे असे आपण समजू लागलो आहोत. इतके असूनही सातत्याने त्रास देणाऱ्या पाकिस्तानशी किंवा चीनशी मात्र स्वतः थेट युद्ध करायचे या देशाच्या कधी मनात येत नाही. मुंबईवर अणुबॉंब पडेल हा 'बागुलबुवा' आहे. तसे धैर्य कुठलाही देश करणार नाही कारण त्यानंतर त्या राष्ट्राचे अस्तित्वच नष्ट होईल. तेव्हा त्यासाठी 'पारंपरिक' युद्ध टाळू नये. सार्वजनिक जीवनात मात्र एखाद्याला गर्दीत सगळ्यांनी घेरुन मारणे एवढाच पराक्रम दिसतो. त्याने खरोखर एखाद्या मुलीची छोड काढलीय की, त्यामागे तिचा काही बनाव आहे. हे सुद्धा बघायला हवे. माझ्या ओळखीच्या एका शालेय विद्यार्थ्याला तर शिक्षकांनीच धोपटले आणि त्याने प्रत्यक्षात काहीच छेडछाड केली नव्हती. सोसायटीत जगताना तर माझा सवाल हा आहे की, सुसंस्कृत, विचार करणाऱ्या लोकांनीच किती काळ मान खाली घालून, धडधडत्या छातीने आणि दाराला तीन कड्या घालून जगायचे? त्यांचा अपराध काय? ज्यांना खरोखर त्रास होतो, ज्यांचे हाल होतात त्यांच्या बाजूने कोण आहे? विचारवंत असेल तर त्याचा कधी 'डोडो' केला जाईल नेम नाही. कोकणात तर अशा सुसंस्कृत लोकांना फार कुणी ओळखतही नाही. तेव्हा गरज आहे ती हुशार, समंजस तरुणांनी सशक्त, समर्थ बनून आपला महाराष्ट्र वाचवण्याची! सुसंस्कृतपणाचे रक्षण करण्याची!

एक सत्य अनुभव सांगतो. मुंबईत रात्री बारा नंतर काही तरूण पोरे फटाक्यांच्या माळा लावू लागली. तेव्हा तर हा रात्री ध्वनिप्रदूषण करायचे नाही असा कायदाही नीट अमलात आला नव्हता. माझे तेव्हाचे सहकारी मनोज हे पत्रकार व व्यायामपटू आहेत. आम्हा दोघांनाही पहाटे उठून कामावर जायचे असे. रात्रीचे हे फुकटचे जागरण परवडण्यासारखे नव्हते.

मनोजने त्या फटाकेवाल्या पोरांना एकदा चांगल्या भाषेत सांगितले पण हिंदीतून ती पोरे उर्मटपणे दुरुत्तर करू लागली. तेव्हा त्यांच्यातल्या मुख्य म्होरक्याच्या कानाखाली मनोजने दोन-तीन 'आवाज' काढले. हे गालावरचे फटाके फुटताच अचानक शांतता पसरली. मनोजची जिगर आणि खमकी प्रकृती बघून त्या बिगर मराठी टोळक्याने माघार घेतली. नंतर कधीतरी ते पुन्हा वचपा काढायला येतील म्हणून आम्ही सावध होतोच! मराठी आवाज जेव्हा खऱ्या समस्यांच्या बाबतीत वाजेल तेव्हा महाराष्ट्राला चांगले दिवस येतील. आमच्या हयातीत असा महाराष्ट्र बघायला मिळेल. अशी आशा फारच कमी आहे हेही खरे! तरीही पोरांनो प्रयत्न करा !!

◆ **माधव गवाणकर,**
दापोली (रत्नागिरी), ९१४५९२४०५३

'चपराक प्रकाशन'ची दर्जेदार ग्रंथसंपदा

- कोंबडं झाकणाऱ्या म्हातारीची गोष्ट (प्रतिवाद) । **भाऊ तोरसेकर** । १५०
- दखलपात्र (अग्रलेख संग्रह) । **घनश्याम पाटील** । १५०
- झुळूक आणि झळा (अग्रलेख संग्रह) । **घनश्याम पाटील** । १५०
- कॉलेज गेट (कादंबरी) । **सागर कळसाईत** । २४४
- एमरल्ड ग्रीन (कथासंग्रह) । **समीर नेर्लेकर** । ७५
- विज्ञानमूर्ती ज्ञानोबा तुकोबा (आध्यात्मिक) । **दत्तात्रेय गायकवाड** । १३०
- थोडं मनातलं (लेख संग्रह) । **विनोद श्री. पंचभाई** । १२०
- ओविली फुले मोकळी (ललित संग्रह) । **सदानंद भणगे** । १५०
- गंध माणसांचा (व्यक्तिचित्रण) । **संजय वाघ** । १३०
- एकनाथजी रानडे (चरित्र) । **सागर सुरवसे** । ७५
- दगडखाणीतील उद्‌ध्वस्त आयुष्य (कादंबरी) । **हणमंत कुराडे**। ७५
- भाषेचं मूळ (भाषाशास्त्र) । **संजय सोनवणी** । ११०
- लोकनायक सयाजीराव गायकवाड (चरित्र) । **सौ. चंद्रलेखा बेलसरे** । ७०
- बाळासाहेब एक अंगार (चरित्र) । **नागेश शेवाळकर** । १७५

या पुस्तकांसाठी संपर्क : ०२० २४४६०९०९, ७०५७२९२०९२

# अभिशाप्त



*भुवनेश्वर* एअरपोर्टवर उतरण्यावर जगन्नाथपुरीकडे जाण्यासाठी टॅक्सी घेतली आणि त्या दिशेने प्रवास सुरू झाला. जीवनात प्रथमच ओरीसा राज्यात प्रवेश केला होता. आमचा व्यवसाय साखर कारखान्याशी संबंधीत, त्यात केरळ, ओरीसा, हिमाचल प्रदेश, काश्मीर व उत्तर-पूर्वेकडील राज्ये येथे साखर कारखानेच नसल्याने या राज्यात मुद्दामहून जाण्याचा प्रसंग न आलेला पण जगन्नाथाच्या कृपेने ओरीसातील एका साखर कारखान्यातून बोलावणे आले आणि म्हणूनच उतरल्या-उतरल्या त्या जगन्नाथाच्या दर्शनाला जायचे ठरविले.

जगन्नाथपुरीच्या रस्त्यावर एके ठिकाणी बऱ्याच ट्रक्स उभ्या असलेल्या दिसल्या. कदाचित परप्रान्तातून आलेले हे ट्रक ड्रायव्हर नाश्ता-पाणी, फ्रेश होण्यासाठी येथे नित्याने उतरत असावीत असा विचार करीत असताना तेथे जवळ-जवळ ३०-४० तरूण मुली जीन्स, साड्या, केप्री आणि वनपीसमध्ये फिरताना दिसल्या. अतिशय सुंदर, देखण्या, गोऱ्या अशा त्या मुली, महिला त्या ट्रकवाल्यांशी हास्यविनोद करत होत्या. कोणी अंगलट येत होत्या. ते ट्रकवाले व त्यांच्यात चांगलेच हास्य-विनोद व छेडा-छेडी चालली असावी असे एकंदरीत त्यांच्या वर्तवणूकीवरून दिसत होते. अशा सार्वजनिक ठिकाणी हा सगळा घृणास्पद प्रकार पाहून कसेतरीच वाटले. रेडलाईट एरियातील बायका रस्त्यावर येऊन अशाप्रकारे राजरोसपणे असे प्रकार करतात, याचेही आश्चर्य वाटले. याचाच विचार करित असताना गाडी मात्र पुढे-पुढे पुरीच्या दिशेने मार्गस्थ होत होती.

तेवढ्यात टोल नाका आला. ड्रायव्हरने टोल देण्यासाठी गाडी थांबवली. तोच मागे तशाच त्या २-४ मुली गाडीच्या भोवती जमा झाल्या. सुंदर, गोऱ्या, देखण्या, आधुनिक पोषाखातल्या पण यावेळी त्या रेड एरियामधील नसून अर्धनारी नटेश्वर पंथातील असलेले जाणवले. त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने टाळ्या वाजवून त्या प्रवाश्यांकडून पैसे मागत होत्या. आमच्याबरोबर तेथील एक इंजिनीअर होते. त्यांनी ताबडतोब शंभर-शंभराच्या पाच नोटा काढल्या व त्या पाचही जणांना वाटून टाकल्या. 'तू खुश रहे, तेरी फॅमिली खुश रहे, दुधो न्हाओ पुतो फलो' असे अनेक आशीर्वाद देऊन ते पाचही जण आले तसे निघून गेले, दुसऱ्या गिऱ्हाईकाच्या शोधात.

आमच्या चेहऱ्यावरील आश्चर्य पाहून ते इंजिनिअर म्हणू लागले, ''बडी जालीम जात होती है, साब इनकी. इनकी दुआमें भी बहुत ताकत होती है. लेकिन इनकी बद्दुआ भी हमको बर्बाद कर देती है. इसलिए मै तो इनकी बद्दुओंसे बहुत घबराता हूँ। चाहे जितने पैसे चले जाए, मै दे देता हूँ और उनकी दुआ लेता रहता हूँ। भगवानने इनके साथ बडा अन्याय किया है। इनमे इनका क्या दोष? माँ-बाप ऐसे बच्चेको इनकी टोली में आके छोड देते है और इनको माँ-बाप होकर भी यतीत की जिंदगी जीनी पडती है।''

खरोखरीच, तृतीय पंथीयाविषयी इतका बारकाईने विचार कधीच केला नव्हता. कोणाकडे लग्न असले, मुल झाले की ही लोकं येतात, गाणी म्हणतात आणि बिदागी मागतात. नवदांपत्याला व नवजात शिशुला भरभरून आशीर्वाद देतात, याचाच आनंद अपूर्व असतो म्हणून सहसा यांना कोणी नाराजही करीत नाही. कधी-मधी रस्त्यात ही एखाद-दुसरा तृतीयपंथी पैसे मागताना, बाजारात दुकानदारांकडुन मागताना दिसतो. या लोकांवर आधारित काही नाटके, चित्रपटही येऊन गेले. त्यांच्या भावना, त्यांचे जीवन, त्यांची दुःखे या निमित्ताने समाजापुढे मांडली गेली. शारीरिक अपूर्णता असली तरी ती माणसेच आहेत. त्यांच्याशी माणूसकीनेच वागावे, अशीही विचारप्रणाली त्यामुळे समाजात रूजली. त्यांनाही निवडणूकीसाठी उभे राहता आले. त्यांच्या समाजाला नेतृत्व लाभले, काही अंशी प्रश्न मार्गी लागले असोत अथवा नसोत पण त्यांना त्यांची एक 'ओळख' मिळाली. अगदीच दुर्लक्षित असलेल्या या समाजाला प्रजासत्ताक देशात थोडेतरी स्थान मिळाले, हे नक्कीच दखलपात्र आहे.

पण तरीही त्यांची दुःखे, त्यांच्या समस्या, त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा उपेक्षेचा भाव अद्यापही कमी झालेला नाही. पांढरपेशा की त्यांच्याकडे तिरस्कृत नजरेने पाहतो. काहीजण त्यांचा गैरवापर करतात. त्यांचं वैगुण्य आधोरेखित करून त्यांना जबरदस्तीने त्या पंथात जगणे भाग पाडले जाते. खरंतर त्यांच्यात जन्मताच असलेले वैगुण्य पाहून त्यावर आई-वडिलांना उपचार करून तो दोष दूर करायला हवा. नाही झाल्यास त्या मुलाला या पंथांतील लोकांकडे सोपविण्याऐवजी सर्वसामान्य मुलांसारखे वाढवून चांगले शिक्षण देऊन, चांगले संस्कार करून, आपल्या मायेची उब देऊन एक सामान्य माणसाचे जीवन द्यायला काहीच हरकत नाही. पुढे मोठे झाल्यावर समुदेशका करवी त्यांच्या अंगभूत उणीवेची त्याला जाणीव करून देऊन अधिक सकारात्मकतेने कसे जगायचे, हे जर शिकवले तर एक जबाबदार भारतीय नागरिक म्हणून निश्चितच ते जीवन जगू शकतील.

एक तर लहानपणापासूनच आई-वडिलांच्या प्रेमाला पारखी झालेली ही मुले कोरडी होतात. त्यात लहानपणापासूनच जीवन जगण्याच्या लढाईत त्यांच्या बालभावना, बालमन कोमेजून जाते. त्यांचे विश्व सिमित होऊन जाते. पुरूषसारखी दाढी-मिश्या असताना क्लीन शेव करून, केस वाढवून साडी नेसताना व समाजात वावरताना, आपण नक्की कोण? का आपल्याला असं वागावं लागतंय? असेही अनेक प्रश्न त्यांना भेडसावित असतील पण आता त्यांच्याकडे पर्याय उरलेला नसतो. असेच भरकटलेले जीवन जगणे त्यांना क्रमप्राप्त असते. त्यांच्यातही मानवसुलभ भावना असतात प्रेम, आनंद, रूसवे, दुःख याचीही अनुभूती त्यांना असते. त्यांचीही सर्वसामान्यांसारखी उच्च ध्येये, आकांक्षा असू शकतात पण तेथपर्यंत पोहचण्यासाठी लागणारी प्रेरणा, शक्ती, दुर्दम्य आशावाद सारा सारा या पंथात येऊन संपलेला असतो कारण त्यांची जगण्याची लढाई मरेपर्यंत संपलेली नसते.

मेल्यानंतरही त्यांचे हाल, विटंबना संपत नसते. मेल्यावरसुद्धा दहन अथवा दफनासाठी मृतदेह नेताना त्यांचेच बांधव त्या मृतदेहाला चप्पल-बुटांनी बडवित स्मशानापर्यंत नेतात. खरंतर माणूस गेल्यावर त्याची अशी विटंबना, अवहेलना करणे उचित नाही पण यांच्या पंथात या कृतीकरवी परमेश्वराला एक रोषपूर्ण संदेश पाठविला जातो, 'या जन्मी अधुरेपण देऊन जन्माला घातलेस, तसेच अपूर्णत्व पुढील जन्मी तरी देऊ नकोस.' म्हणून त्या मृतदेहाला चक्क फटके मारले जातात व तेही चप्पल-बुटांनी! केवढी ही विटंबना, केवढे हे क्रौर्य? पण यांचा रोष, राग त्या आपल्या बांधवावर नसतो, तर ते रागावलेले आहेत त्या जन्मदात्या परमेश्वरावर, ज्याने त्यांना त्यांचा काहीच दोष नसताना असे तुच्छतापूर्ण अपूर्णत्व दिले आहे आणि म्हणूनच देवाला तशी प्रार्थना करण्याऐवजी 'तू दिलेले असे व्यंगपूर्ण, अपूर्ण शरीर आम्हाला नको' म्हणून कदाचित ते त्या मृतदेहाशी असे वागत असतील.

कारणे काहीही असोत पण संवेदनशील मनाचा माझा कोपरा हे सत्य ऐकून नक्कीच हळहळला होता आणि माझा तृतीयपंथीयांच्याकडे पाहण्याचा नजरीया देखील. अशा या अभिशप्त जमातीकडे पाहण्याचा दृष्टिकोन समाजाच्या प्रत्येक व्यक्तीने बदलून माणूसकीच्या नात्याने एक भावभावना, संवेदना असणाऱ्या व्यक्ती म्हणून त्यांचा स्वीकार करायला हवा. नाहीतरी समाजातील प्रत्येक अपंग, व्यंग व्यक्तीला आपण सहृदयतेने स्वीकारतोच ना? त्याच सहिष्णु नजरेने, सहृदयतेने यांचाही स्वीकार करावा हीच मनापासून इच्छा!

◆ **चंद्रलेखा बेलसरे**
९८५०८९५०५१

# युरेका! युरेका! स्मृती फसली रे



*बुधवारी* लोकसभेत मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी यांनी अतिशय आक्रमक पद्धतीने आपल्यावरचे सर्व आरोप फेटाळून लावत भूमिका मांडली. त्यांच्या भाषणाचे थेट प्रक्षेपण देशभर झाले आणि माध्यमातील त्यांच्या टिकाकार विरोधकांनाही स्मृतीच्या गुणवत्तेला दाद द्यावी लागली पण ती दाद मनापासून नव्हती, तर देशभर जो माहोल त्या एका भाषणाने बदलला होता, त्याला हे माध्यमातले विरोधक शरण गेले होते. मात्र प्रत्यक्षात स्मृतीच्या भाषणात कुठे खोट काढता येते, त्याची जाडजुड भिंगे घेऊन तपासणी चालू होती. त्यात काही 'खोट' म्हणजे त्रुटी सापडत नसेल, तर निदान दिशाभूल करण्यासारखा मुद्दा तरी शोधणे भाग होते. त्यालाच पुरोगामीत्व असे नाव आहे ना? धडधडीत खोटे बोलल्याशिवाय ज्यांना अन्नाचा घासही घशाखाली उतरत नाही, त्यांनी खुल्या दिलाने स्मृतीच्या भाषणाचे गुणगान करण्याची अपेक्षाच करता येणार नाही. म्हणून दूर अवकाशातले तारे शोधण्यासाठी दुर्बिणा वापराव्यात, तशी उपकरणे लावून संशोधन सुरू झाले आणि आर्किमीडिजचे आधुनिक वारसदार आपल्या अंगावरची वस्त्रेही फेडून 'युरेका युरेका', ओरडत न्हाणीघरातून नागडेउघडे धावत रस्त्यावर आले. कोणता मोठा शोध लावला होता त्यांनी? तर लोकसभेत स्मृती इराणी खोटे बोलल्या. त्यांनी संसदेची व देशाची दिशाभूल केली. त्यांनी राजीनामा दिलाच पाहिजे आणि काय खोटे बोलल्या मनुष्यबळ विकासमंत्री? तर रोहित वेमुला याच्या आत्महत्येनंतर दिर्घकाळ त्याच्या मृतदेहापाशी डॉक्टर्सना जाऊ देण्यात आलेले नव्हते. मुळात तिथे पोहोचलेल्या डॉक्टर्सची साक्ष काढून स्मृतीला खोटे पाडण्यात आले आहे. किती सज्जड पुरावा आहे ना? हेडली खोटारडा असतो, इतक्या ह्या डॉक्टर खरे बोलत आहेत. त्या डॉक्टरनीच स्मृतीचा दावा खोटा पाडला आहे कारण माहिती मिळताच आपण विनाविलंब रोहितपाशी पोहोचून त्याची प्रकृती तपासली असे त्यांचे म्हणणे आहे.

रोहितच्या आत्महत्येची माहिती मिळताच डॉक्टर राजश्री तिथे पाच मिनीटात पोहोचल्या आणि त्यांनीच तपासणी करून त्याला मृत घोषित केले होते. त्याच आरोग्य विभागात तेव्हा ड्युटीवर होत्या. साहजिकच त्यांच्या या दाव्याला कोणी आव्हान देवू शकत नाही; पण म्हणून स्मृती इराणी लोकसभेत खोटे बोलल्या, असा दावा कसा करता येईल? स्मृतीने केव्हाही डॉक्टर राजश्री यांच्या हवाला देवून असे विधान केलेले नाही. किंबहूना आज डॉक्टर राजश्री पोपटासारख्या बोलत आहेत, तर त्यांनीच तेव्हा ही माहिती आपल्या मंत्री महोदयांकडे कशाला पाठवली नव्हती? इतके दिवस डॉक्टर त्याविषयी गप्प कशाला बसल्या होत्या? स्मृतीनी लोकसभेची फसवणूक करण्याची त्यांना प्रतिक्षा होती काय? रोहितच्या आत्महत्येचे भांडवल करण्याचा डाव इथेच उघडा पडतो. या आत्महत्येविषयी मंत्री म्हणून आपण काय धावपळ केली, त्याचा गोषवारा स्मृतींनी आपल्या भाषणातून दिला. त्यामध्ये स्थानिक पातळीवर किती बेफिकीरी व हलगर्जीपणा होता, त्याचाच पाढा त्यांनी लोकसभेत वाचला. डॉक्टर राजश्री वा त्यांच्या खुलाश्याला दुजोरा देणाऱ्या शिकरुल्लाह निशा, या दोघांनी स्मृतीला खोटे पाडण्यापेक्षा त्यांच्याच आरोपाला दुजोरा दिलेला आहे. स्मृती इराणी यांनी आपल्या भाषणात स्थानिक प्रशासन व सरकार किती गाफील व बेपर्वा होते, त्यावर बोट ठेवलेले आहे. तेलंगण राज्यात हे विद्यापीठ आहे आणि केंद्रीय विद्यापीठ असले तरी स्थानिक कायदा व्यवस्था राज्याचा अधिकार आहे. म्हणून बातमी कळताच आपण राज्याचे मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांच्याशी संपर्क साधला; पण ते कामात आहेत म्हणून आपल्याला त्यांच्याशी बोलूही देण्यात आलेले नव्हते. त्यांच्या खासदार कन्येशीही आपण संपर्क साधला, पण तिनेही कुठला प्रतिसाद दिला नाही. तेव्हा स्थानिक पोलिसांशी संपर्क साधून आपल्याला माहिती मिळवावी लागली, असे स्मृतीचे कथन आहे.

'स्मृती खोटे बोलल्या' या शिर्षकाची जी बातमी 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये प्रकाशित झाली आहे, त्यातही तेच म्हटले आहे. असा दावा इराणी यांनी तेलंगण पोलिसांच्या हवाल्याने केला होता. म्हणजेच पोलिसांकडून जी माहिती मिळाली, त्यानुसार स्मृतीला बोलावे लागले. कारण जो इतका भयंकर तातडीचा सेक्युलर विषय आहे, त्याबद्दल इतके आठवडे लोटले, तरी पुरोगामी मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांना केंद्राला माहिती देण्याची गरज भासलेली नाही. किंबहूना तथाकथित सेक्युलर राजकारणी नेत्यांची रोहितला जीवंत ठेवण्यामध्ये किती अनास्था होती, तेच तर स्मृतीला आपल्या भाषणातून सिद्ध करायचे होते. घटनेच्या दिवशी सोडाच, अजूनपर्यंत राव यांनी आपल्याला 'उलट प्रतिसाद' म्हणून फोन केलेला नाही, असेही स्मृतीने ठामपणे लोकसभेत सांगितले. मग डॉक्टर राजश्री यांचा दावा कशासाठी आहे? जी माहिती पोलिसांनी स्मृती इराणींना दिली, त्यापेक्षा अधिक माहिती त्यांना पुरवण्याचे कर्तव्य डॉक्टर राजश्री यांनी कशाला पार पाडले नाही? आपला मुख्यमंत्री काही करत नसेल, तर डॉ. राजश्री केंद्रीय मंत्र्याला माहिती द्यायला गेल्या नाहीत, इतके दिवस गप्प राहिल्या. त्यांना सत्य समोर येण्यापेक्षा स्मृतीला खोटे पाडण्यात रस असावा. रोहित मेला काय नि जगला काय? त्याची कुणा सेक्युलर पुरोगाम्यांना फिकीर नाही. त्यांना स्मृती वा भाजपाला खोटे पाडण्यात स्वारस्य आहे. त्यात मग रोहित वा तत्सम मुलांनी आपला बळी द्यायचा असतो. मुख्यमंत्री भेटत नसेल, तर या डॉक्टर राजश्री कोण व त्या कुठे कुठे कधी जातात, किंवा त्यांचा फोन नंबर काय, त्याचा सर्व तपशील स्मृतीपाशी असला पाहिजे, पण चंद्रशेखर राव किंवा अन्य कुणा सेक्युलर नेत्याने मात्र केंद्रीय मंत्र्याला त्यासाठी धावपळ करायला आग्रह धरण्यासाठीही साधा फोन करू नये, याला पुरोगामीत्व म्हणतात. त्यासाठी रोहित सारख्यांनी मरायचे असते आणि पुरोगामी हुतात्मे व्हायचे असते.

स्मृतीला खोटे पाडण्यासाठी जितकी बुद्धी वापरण्यात आली किंवा तत्परता दाखवण्यात आली, तितकी पुरोगामी तातडी रोहितला वाचवण्यासाठी दाखवण्यात आली होती काय? रोहितने आत्महत्या करू नये, यासाठी कुठल्या पुरोगाम्याने किती हातपाय हलवले, याचा कुठलाही तपशील नाही. त्याच्यासह ज्या विद्यार्थ्यांवर कारवाई झाली, ती हटवून त्या विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, म्हणून एका तरी सेक्युलर नेत्याने संबंधित मंत्री म्हणून स्मृती इराणी यांना पत्र लिहून, फोन करून किंवा प्रत्यक्ष भेटून काही केले होते काय? आज ज्यांना रोहितचा उमाळा आला आहे, त्यापैकी एकाने तरी तो निराश-हताश असताना आत्महत्येपर्यंत जाण्यापासून त्याला वाचवण्यासाठी कोणते उपाय योजले, त्याचा कुठलाही तपशील समोर आलेला नाही. तो तपशील आणायचा विचारही कुणा सेक्युलर मेंदुला शिवलेला नाही. शिवणार तरी कसा? काही केलेलेच नाही. कुणाही पुरोगाम्याला रोहितच्या हाल वा अन्यायाविषयी काडीची फिकीर नव्हती. त्याच्या जिवंत असण्याने कुठलाही पुरोगामी राजकीय लाभ नव्हता. त्यापेक्षा त्याच्या आत्महत्या वा मृत्यूने पुरोगामी लाभ होता. म्हणून हे डोमकावळे त्याच्या वा तत्सम मुलांच्या मृत्यूकडे आशाळभूत नजर लावून बसले होते. त्याला मरू दिले गेले, आत्महत्या करू दिली गेली आणि मगच सगळ्यांची कावकाव सुरू झाली आहे. स्मृती इराणी यांनी त्याकडेच नेमके बोट दाखवले आहे. स्मृतीनी निदान बातमी कळताच धावपळ केली आणि तेलंगणाच्या मुख्यमंत्र्याशी संपर्क साधला. तेव्हाही त्यांना दाद मिळाली नाही. हीच तर स्मृतीने पुरोगाम्यांची सादर केलेली लक्तरे आहेत. डॉक्टर राजश्री त्याचीच ग्वाही देत आहेत. कारण त्या रोहितची तपासणी करायला गेल्या, हे मुख्यमंत्र्याला ठाऊक नव्हते आणि तेलंगणाच्या पोलिसांनाही ठाऊक नव्हते. स्मृतीने धावपळ करूनही त्यांना दिल्लीत काही कळू शकत नव्हते. कारण प्रत्येक पुरोगाम्याला रोहित मेलेलाच हवा होता. खोटे कोण किती बेधडक बोलतोय ते यातून लक्षात येते.

◆ **भाऊ तोरसेकर**
९७०२१३४६२४

# शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची लाज का वाटत नाही? : डॉ. नागनाथ कोत्तापल्ले



**पुणे, (प्रतिनिधी) :**
छत्रपती शिवाजी महाराजांनी कष्टकरी, शेतकऱ्यांना नेहमी संरक्षण दिले. युद्ध मोहिमेवर जात असतानाही शेतकऱ्यांच्या पिकांची नासाडी होऊ नये, अशा सक्त सूचना सैन्यांना असायच्या. आज आपण महाराजांचे नाव घेत असताना या महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्यांची आपल्याला लाज का वाटत नाही?, असा प्रश्न ज्येष्ठ साहित्यिक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी शिवजयंती निमित्ताने बोलताना केला.

शिवस्फुर्ती प्रतिष्ठान व शिवस्पर्श प्रकाशनच्या वतीने दिला जाणारा 'महाराणी ताराराणी पुरस्कार' माहेर संस्थेच्या सर्वेसर्वा ल्युसी कुरियन यांना तर 'शिवपुत्र संभाजीराजे पुरस्कार' इतिहास संशोधक चंद्रशेखर शिखरे यांना डॉ. कोत्तापल्ले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, शाल, तुळशीचे रोप व रक्कम रू. ५००० असे पुरस्काराचे स्वरूप होते. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

या प्रसंगी यवतमाळ, चंद्रपूर व पुणे जिल्ह्यातील मरकळ या ठिकाणची ७ आत्महत्याग्रस्त कुटुंबे दत्तक घेण्यात आली. ही कुटुंबे आर्थिक व मानसिकदृष्ट्या स्थिर होण्यासाठी विशेष प्रयत्न प्रतिष्ठान करणार आहे. या कुटुंबातील मुलांना शिवस्पर्श 'शैक्षणिक दत्तक योजनेत' सहभागी करून घेण्यात येणार आहे. अशी अनेक कुटुंबे या दत्तक योजना साखळीत गुंफण्याचा प्रतिष्ठानचा मनोदय आहे. यासाठी प्रत्येक कुटुंबाला प्रतिवर्षी रक्कम रू. १५००० ची आर्थिक मदत दानशूर देणगीदारांच्या माध्यमातून दिली जाणार आहे.

तसेच शिवस्पर्श शैक्षणिक दत्तक योजनेअंतर्गत १० विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच हजारांची आर्थिक मदत प्रतिवर्षी देण्यात येते. यात विशेषत: सी. आर. रंगनाथन या कर्णबधीर स्कूलची पूजा राक्षे, निवांत मुक्त अंध विकासालयचा एल. एल. बी. त शिक्षण घेणारा युवराज झंझाडे, वंचित विकास संस्थेची नीहारमधील प्रीती कांबळे या विशेष विद्यार्थ्यांचा समावेश आहे. गेली ८ वर्षे सुरू असलेल्या या दत्तक योजनेचा लाभ आजपर्यंत २२ विद्यार्थ्यांनी घेतला आहे. शिक्षण पूर्ण होईपर्यंत ही मदत प्रतिवर्षी दिली जाते. तसेच प्रतिवर्षी सामाजिक संस्थेला दिली जाणारी रक्कम रू. ११००० ची मदत माहेर या संस्थेला देण्यात आली.

यावेळी मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरूषोत्तम खेडेकर, युवा शास्त्रज्ञ बाळासाहेब दराडे, महापालिकेचे सहआयुक्त ज्ञानेश्वर मोळक, प्रविण गायकवाड, प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ॲड. शैलजा मोळक आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात शिवस्पर्शच्या 'कहाणी स्त्रीजन्माची' या विशेषांकाचे तर सुशीला संपकाळ लिखित 'महाराष्ट्रातील पारंपरिक लोककला' व 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या पुस्तकांचे, विजय विचेकर लिखित 'नि:शब्द गझल' या काव्यसंग्रहाचे तर ॲड. शैलजा मोळक लिखित 'लग्न... एक सप्तसूर' या पुस्तकाच्या तृतीय आवृत्तीचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.

प्रतिष्ठानकडून शेतकऱ्यांसाठी व शैक्षणिक दत्तक योजनेत होत असलेल्या कार्याचे डॉ. कोत्तापल्ले यांनी कौतुक केले. त्यानंतर शेतकऱ्यांच्या संदर्भात ते म्हणाले, ''महाराष्ट्रात १९९० पासून आतापर्यंत तीन लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यामुळे महाराष्ट्राला 'शेतकऱ्यांची स्मशानभूमी' म्हटले जाऊ लागले आहे. शेतकरी प्रश्नांवर झालेली आंदोलने व्यवस्थेने अक्षरश: गिळंकृत केली. जातींमुळे चळवळी तुटून पडल्या. इथला मावळा, गोरगरीब शेतकरी प्रतिष्ठेने जगले पाहिजेत. छत्रपती शिवरायांची दूरदृष्टी ही शेतकरी-कष्टकऱ्यांना संरक्षण देण्याची होती. ते धर्म-जातीपलीकडे जाऊन विचार करत. त्यामुळे प्रतिकात्मक का होईना शिवस्फूर्ती प्रतिष्ठानचे चाललेले काम महत्त्वाचे वाटते. जातीवरती मात कशी करायची हा मोठा प्रश्न शिवाजी महाराजांनी सोडवला होता. ती योजना अंमलात आली असती तर मोठे परिवर्तन झाले असते'' असेही ते म्हणाले.

'भारताचे शाश्वत भवितव्य व तरूणाई' या विषयावर बोलताना शास्त्रज्ञ बाळासाहेब दरडे म्हणाले की, ''सत्ता कधीही शाश्वत नसते; ती नेहमी बदलत असते. त्यामुळे प्रथम प्राधान्य हे व्यक्ती विकासाला असून त्यातून होणाऱ्या समाज विकासातून राजकीय क्रांती घडेल. राजकीय व्यवस्थेला दोष देण्यापेक्षा चांगल्या तरूणांनी या व्यवस्थेत उतरून बदल घडवावा. जुने राजकारण यापुढे फार काळ चालणार नाही. राजकारण हेच आपले विचार पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाला प्राधान्य देऊन ध्येय निश्चिती करा. दूरदृष्टी, दिशादर्शक व नेतृत्व या गुणांनीच माणूस घडू शकतो.''

यावेळी पुरस्कार विजेते ल्युसी कुरियन, चंद्रशेखर शिखरे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. शैलजा मोळक तर सूत्रसंचालन प्रज्ञेश मोळक यांनी केले. अमोल शिंदे यांनी शिवस्पर्श गीत सादर केले व कैलास वडघुले यांनी आभार मानले.

## राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेत पुणे जिल्ह्याला १७ पदके

**लोणी काळभोर, (वार्ताहर) :**
औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ बॅडमिंटन हॉलमध्ये संपन्न झालेल्या राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेत पुणे जिल्ह्याने १७ पदकांची कमाई केली. त्यामध्ये ४ सुवर्ण, ३ रौप्य, १० कांस्य पदक मिळवले.

यामध्ये १० वर्षाखालील गटात प्राची गायकवाड (सुवर्ण), योगीता सोनवणे (सुवर्ण), आर्यन बनसोडे (कांस्य) हर्षद काकडे (कांस्य), १४ वर्षाखालील गटात रवी राठोड, प्रसाद पवार, सौरभ काळभोर, संग्राम गावडे, प्रथमेश हेंद्रे, प्रज्वल कुंजीर, विवेक नवले यांनी कांस्य पदक तर १७ वर्षाखालील गटात लखन हेबांडे (सुवर्ण), स्मिता पोळ (सुवर्ण) सौरभ हेबांडे (रजत), दयानंद गव्हाणे (रजत), प्रविण गिते (कांस्य), संदीप खेडकर (कांस्य) या विद्यार्थ्यांनी पदके जिंकली.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष ॲड. सोपान शेजवळ, सचिव मिलिंद काटमोरे, नागेश काळभोर, लक्ष्मण उदमले, डॉ. उदय डोंगरे, जिल्हा क्रीडा अधिकारी उर्मिला मोराळे, चंद्रशेखर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. पुणे जिल्ह्यातून या खेळाडूंचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## बदललेलं प्रेम

बंद झालयं
तिच्या दारातून गाणं म्हणत जाणं
तिला खुणावून
नदीवरती बोलवणं
खरचं,
किती बदललं ना, प्रेम आपलं?
स्वत:चं गाणं गाऊन,
मेसेज ने खुणा देऊन,
मोबाईल ने प्रेम जपलं आपलं
एवढं मात्र नक्की

आधी चोरून भेटलो जरी
तरी एकावरचं मरायचो
भिती होती पण,
मनापासून झुरायचो
आता,
बोलण झाल सोपं
तरी विश्वास नाही उरला
एक झालं की दुसरं होईल
हाच ध्यास मनी भरला

खरचं, बघा ना राव
प्रेम किती बदललंय

सोपं म्हणता म्हणता
किती अवघड झालंय

गावाकडच्या प्रेमालाही
शहरी रुप आलयं
खरं सांगतो,
गावकडच्या प्रेमालाही
शहरी रूप आलंय

◆ **प्रमोद जा. चांदेकर**
मलगड, कोल्हापूर
७०३८७६७१९६



## गगन भरारी...

विसरुन दु:खे सारी
घे तू गगन भरारी

फुलुदे असेच हासू
पापणीच्या आड आसू

दे झोकून घे गुंतून
येईल फुलून स्वप्न

दिस आजचा उद्याला
तुला दिसनार नाही

कष्टाशिवाय उद्याचा
दिस हसनार नाही

घे बदलून दिशा तू
झुरतील ग्रह तारे

शनी राहू आणि केतू
होतील प्रसन्न सारे

पाहून प्रयत्न तूझे
फुलवी मोर पिसारे

ठरव तव मनात
कर एक दीन रात

सूर्य उद्याचा तुझ्याच
ऊगवेल तव अंगणात

तू दे हाक आंतरीच्या
सर्वशक्तिमान प्रभूला

देईल आशिष तोही
यश किर्ती संपदाही

◆ **अनिल कोठे, भोसरी**
९३७१०१५५४१

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी नेद प्रिंटर्स, ५९८, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० येथे छापून शॉप नं. १, श्री दुर्गाकुंज हौसिंग सोसायटी, १६१, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक : घनश्याम वसंतराव पाटील.** (अंकातील मजकूराशी संपादक कदाचित सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत)

संपादकीय कार्यालय : 'चपराक', ६१७, 'साईकृपा', पहिला मजला, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२. भ्रमणध्वनी : ९२२६२२४१३२ Email : info@chaprak.com